आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

८ एप्रिल २०२४ - सोमवार

.

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत संपली /राज्यातल्या ८ जागांसाठी आता २०४ उमेदवार रिंगणात

- विरोधकांनी सत्तेत असताना फक्त स्वत:च्याच परिवाराचा विकास केल्यानं महाराष्ट्राची उपेक्षा झाल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची चंद्रपुरात टीका

- मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी राजकीय बैठका होत असल्याच्या तक्रारीवरुन निवडणूक आयोगाची संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**आणि**

- गुंतवणूकदारांनी खरेदीवर भर दिल्यानं दोन्ही शेअर बाजारांच्या निर्देशांकांनी गाठली नवी उंची

<><><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत संपली. या टप्प्यात राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघांमधे एकूण ९५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे आता एकूण २०४ उमेदवार रिंगणात आहे. अमरावतीमध्ये ३७, परभणीत ३४, हिंगोलीत ३३, वर्ध्यात २४, नांदेडमधे २३, बुलडाण्यात २१, यवतमाळ-वाशिममध्ये १७ आणि अकोल्यात १५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. या लोकसभा मतदारसंघांमधे येत्या २६ तारखेला मतदान होणार आहे.

**परभणी** मतदारसंघात आज बाळासाहेब उगले, हरिभाऊ शेळके, कौसडीकर निहाल अहमद, विठ्ठल तळेकर, जयश्री जाधव, डॉ. यशवंत कसबे आणि अर्चना गायकवाड या ७ जणांनी अर्ज मागे घेतले. किशोर ढगे यांच्या स्वाभिमानी पक्षाच्या अर्जात त्रुटी निघाल्यानं त्यांना अपक्ष म्हणून निवडणूक लढवता येईल.

**नांदेड** लोकसभा मतदारसंघात ४२ उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे २३ उमेदवार रिंगणात आहेत.

**अकोला** लोकसभा मतदार संघातून भाजपाचे माजी आमदार नारायण गव्हाणकर यांनी माघार घेतल्यानं भाजपा उमेदवार अनुप धोत्रे यांना दिलासा मिळाला आहे.

**हिंगोली** लोकसभेचे तिकीट शिवसेनेला सुटल्यामुळे नाराज झालेल्या तीन पदाधिकाऱ्यांनी बंडाचं निशाण फडकावत अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला होता. त्यात भाजपाचे रामदास पाटील, शाम भारती महाराज यांचा समावेश होता. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड, आमदार श्रीकांत भारतीय यांच्या शिष्टमंडळानं या बंडखोरांची भेट घेतल्यानंतर दोघांनी आज अर्ज मागे घेतले. भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शिवाजी जाधव यांनी मात्र अर्ज कायम ठेवला आहे.

दरम्यान, **यवतमाळ वाशिम** लोकसभा मतदारसंघातले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अभिजित राठोड यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरला होता. त्याला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं आज फेटाळली.

**<><><><><><>**

दुसऱ्या टप्प्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात एकूण १ कोटी ४९ लाख २५ हजार ९१२ मतदार आहेत. १६ हजार ५८९ मतदान केंद्र या ठिकाणी आहेत. या मतदारसंघातले १८ हजार ४७१ मतदार पोस्टाद्वारे आणि १४ हजार ६१२ मतदार घरुन मतदान करणार आहेत. घरुन मतदान करणाऱ्यांमध्ये १० हजार ६७२ मतदार हे ८५ वर्षांवरचे ज्येष्ठ नागरिक, ३ हजार ५५५ मतदार हे ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांग आणि ३८५ अत्यावश्यक सेवेतले मतदार आहेत.

**<><><><><><>**

विरोधकांनी सत्तेत असताना फक्त स्वत:च्याच परिवाराचा विकास केला आणि त्यांच्या काळात महाराष्ट्राची उपेक्षा झाल्याची टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केली. लोकसभा निवडणुकीसाठी त्यांची राज्यातली पहिली प्रचारसभा चंद्रपुरात झाली. महायुतीचे चंद्रपूरचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार तसंच गडचिरोली चिमूर मतदार संघाचे उमेदवार अशोक नेते यांच्यासाठी ही प्रचारसभा होती. त्यावेळी ते बोलत होते. रालोआ सरकारच्या काळात महाराष्ट्रातच नाही तर देशाच्या इतर भागातही नक्षलवाद कमकुवत झाला असून विकासाला चालना मिळाल्याचं त्यांनी सांगितलं. विकासकामात कमिशन द्या नाहीतर विकासकामं बंद करा असं महाराष्ट्रात विराेधकांच्या काळात सुरू होतं, असंही त्यांनी नमूद केलं. गरीब, वंचित समाज मोदी सरकारला आपलं सरकार मानतो, असंही ते म्हणाले. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात मुस्लीम लीगची भाषा असल्याची टिपण्णी त्यांनी केली. लोकसभा निवडणुकीत विकसित भारताचं स्वप्न साध्य करण्यासाठी भाजपा उमेदवारांना निवडून द्या, असं आवाहनही मोदी यांनी केलं.

देशात उन्हाच्या तडाख्याबरोबरच राजकीय वातावरण तापलेलं असतानाही चंद्रपूरवासीय मोठ्या संख्येनं उपस्थित असल्याबद्दल त्यांनी भाषणाच्या

सुरुवातीलाच गौरवोद्गार काढले. त्यांनी मराठीतून भाषणाला सुरुवात केली आणि मराठीतून गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

देशात फक्त भाजपा नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची गॅरंटी चालते, देशाला ते महासत्तेच्या दिशेनं घेऊन जात असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, ओबीसी आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहिर, सुधीर मुनगंटीवार, अशोक नेते उपस्थित होते.

या सभेसाठी चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. विदर्भातल्या पाच मतदार संघात १९ एप्रिलला मतदान होणार आहे.

**<><><><><><>**

नेता, नीती आणि नियत असलेला पक्ष परिवर्तन घडवून आणू शकतो असं, उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते योगी आदित्यनाथ यांनी म्हटलं आहे. ते आज वर्धा जिल्ह्यात हिंगणघाट इथं महायुतीचे वर्धा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रामदास तडस यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश सर्व क्षेत्रात विकास साधत आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

मुख्यमंत्र्यांचं शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर राजकीय बैठका होत असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे दाखल झाली होती. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. या नोटीशीचं

उत्तर प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई होईल. मुंबई शहराच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ही नोटीस बजावल्याचं ते म्हणाले.

याशिवाय मंत्री, खासदार, आमदार यांच्यासह अधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानांचा उपयोग राजकीय कारणासाठी होणार नाही याची खबरदारी घेण्याचं पत्रही निवडणूक आयोगानं राज्याच्या मुख्य सचिवांना लिहिलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

देशांतर्गत शेअर बाजारांमधे आज गुंतवणूकदारांनी खरेदीवर भर दिल्यानं दोन्ही बाजारांच्या निर्देशांकांनी नवी उंची गाठली.

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज दिवसभरातल्या व्यवहारात एकदा ७४ हजार ८६९ अंकांची विक्रमी उंची गाठली. दिवसअखेर तो ४९४ अंकाची वाढ नोंदवत ७४ हजार ४४३ अंकांवर बंद झाला.

राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १५३ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ६६६ अंकांवर बंद झाला. निफ्टीनही दिवसभरात एकदा १८४ अंकांची झेप घेत २ हजार ६९७ अंकांची ऐतिहासिक उंची गाठली होती.

माहिती तंत्रज्ञान आणि वाहन क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग आज विशेष तेजीत राहिले.

**<><><><><><>**

देशभरातल्या विविध प्रांतात विविध नावांनी साजऱ्या केल्या जाणाऱ्या गुढी पाडव्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जनतेला  शुभेच्छा दिल्या आहेत. गुढी पाडवा, चैत्र शुक्लादी, उगाडी, चेती चांद, नवरेह आणि साजिबू चैरोबा अशा विविध नावांनी साजरा केला जाणारा हा सण सर्वांसाठी  आनंद तसंच समृद्धी घेऊन येवो

आणि देशाच्या विकासासाठी नेटानं काम करण्याची प्रत्येकाला प्रेरणा देवो, असं मुर्मू यांनी या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. नव वर्षाच्या प्रारंभी येणारा हा सण म्हणजे वसंत ऋतूचं स्वागत करण्याची एक पर्वणी आणि भारतीय संस्कृतीचं तसंच वारशाचं प्रतीक असल्याचं मुर्मू यांनी या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अकोला मतदारसंघाचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रकाश आंबेडकर यांना प्रेशर कुकर हे निवडणूक चिन्ह मिळालं आहे. परभणीत राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांना शिट्टी हे निवडणूक चिन्ह मिळालं आहे.

**<><><><><>**

वसईचे माजी आमदार आणि जनता दलाचे ज्येष्ठ नेते डॉमनिक गोन्सालविस यांच्या पार्थिवावर आज सकाळी अंत्यसंस्कार झाले. वृद्धापकाळानं काल त्यांचं राहत्या घरी निधन झालं होतं. ठाणे जिल्हा परिषद सदस्य, अशा विविध पदांवर त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. तसंच सामाजिक क्षेत्रातही त्यांचं मोठं योगदान होतं.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण परभणी लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडयामध्ये तुरळक ठिकाणी, तर विदर्भात काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची दाट शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

अहमदनगर, सांगली, सोलापूर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशीव जिल्ह्यात एक दोन ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगानं वारे वाहतील, असा अंदाज आहे.

**//<><><><><><>//**